# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २७/०९/२०२३

➢ दुखापत :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. ८०१/२०२३ कलम ३२६,३४ भादवि | वैष्णवी देवी मंदीर जवळ चांदुर रेल्वे रोड अमरावती | दि. २६/०९/२०२३ रोजी १०.०० वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दि.२७/०९/२०२३ चे ००.०५७ वा | संतोष श्रीकृण्ण नागलकर वय ५२ वर्ष, रा. धंदा-व्यवसाय झेरॉक्स रा. हनुमान मंदीरजवळ देवपेठ वाशिम जि.वाशिम | १)सुनिल अंबादास जासुदकर,,<br>२) अंबादास जासुदकर,<br>३) सुनिल जासुदकर यांची मोलकरिन सर्व रा. वैष्णवी देवी मंदीर जवळ चांदुर रेल्वे रोड अमरावती | नक्कल जबाणि रिपोर्ट - मी नमुद पत्यावर कुटुंबासह राहतो माझा भाचा नामे प्रशांत लखंडे रा. औरंगाबाद याचे माध्यमातुन गेल्या सहा वर्षापुर्वी माझ ओळख अमरावती येथील सुनिल जासुरकर नावाच्या व्यक्ती सोबत झाली होती तो पैसे घेवुन लोकांना नोकरि लावुन देतो त्यामुळे ओळखीतुन मी तीन वर्षापुर्वी माझ्या संपर्कातील नातेवाईक तसेच मित्र मंडळीतील दहा मुलांचे नोकरि लावण्याकरिता चाळी लाख रुपये टप्याटप्याने एमन.एफ.डी चेक व्दारे तसेच काही पैसे नगदी स्वरुपात सुनिल जासुदकर यास दिले होते तेव्हा पासुन आज पर्यंत त्याने मुलांना नोकरि लावुन दिली नाही तसेच आम्ही त्यास दिलेली रक्कम सुध्दा परत दिली नाही मी त्याला बरेच वेळा फोन केला परंतु त्याने पैसे देण्यास टाळाटाळ केली आज दि. २५/०९/२०२३ रोजी सुनिल जासुदकर याने त्याचे मोबालईल वर मलाफोन करण्यास सांगीतले की, मी उद्या तुमचे पैसे परत देतो तुम्ही माझ्या घरी या असे सांगीतले वरुन मी दि. २६/०९/२०२३ रोजी ०९.३० वा दरम्यान अमरावती येथे आलो व दस्तुर नगर येथे राहत असलेल्या माझा भाचा नामे शंशाक विनोद तांदळे याची टु व्हीलर गाडी घेवुन एकटाच सुनिल अंबादास जासुदकर वय ४५ वर्ष, रा. वैष्णव देवी मंदीर जवळ चांदुर रेल्वे रोड अमरावती याचे घरी गेलो तेव्हा त्याचे घरी तो स्वता व त्याचे वडिल अंबादास जासुदकर व त्याचे नातेवाईक उपस्थीत होते मी तेथे सकाळी १०.०० वा दरम्यान त्यास पैसे परत मागीतले असता त्याने मला सांगीतले दोन तिन दिवसात माझ्या कडे पैसे येणार आहे त्या नंतर मी तुम्हाला पैसे देतो या कारणावरुन आमच्या दोघात वाद विवाद झाला व त्याने मला शिवीगाळ करायला सुरवात केली त्या नंतर त्याने माझ्यासोबत झटापट करून मला लाथा बक्यांनी मारहाण केली दरम्यान सुनिल जासुदकर याने त्याचे घरातील आवारातील लाकडी राफ्टर घेवुन माझ्या अंगावर मारण्यास आला वत्याने माझ्या डोक्यावर मध्यभागी तसेच उजव्या पायाचे टोंगळयाचे खाली राफटरने मारहाण केली मी तेथुनच माझा भाचा शंशाक यास फोन लावुन तेथे बोलाविले थोडयावेळाने माझा भाचा त्याचे मित्रसह तेथे आला त्यांनीमला मोटर सायकल वर बसवुन दवाखाना येथे आणुन भर्ती केले सध्या माझ्या आय.सी. यु मध्ये ुपचार सुरु आहे हेच माझे बयाण असुन माझे सांगणेप्रमाणे लीहीले वाचुन पाहीले सांगीतले प्रामणे लीहीले आहेबरोबर आहे अशा फिर्यादीच्या बयाणावरुन व मेडीकल रपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल. |

➢ **विश्वासघात (फसवणुक) :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | झोन क्र. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २. | पो.स्टे. सायबर अप.नं. ३३/२३ कलम ४१९, ४२०, भा. दं.वि. सह कलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायदा २००० | ०१ | दस्तुर नगर अमरावती | दि. १७.०७.२०२३ चे १७.०० वा.<br><br>दाखल ता. वेळ - दि. २६.०९.२३ चे २०.४२ वा. | शुभम कीशोर तेलखडे वय २९ वर्ष रा. दस्तुर नगर अमरावती मो. | एकव्हॉटसअप क्रमांक धारक | हकिकत अशा प्रकारे आहे की, दिनांक २०/०७/२०२३ रोजी सायबर पोलीस स्टेशन येथे ncrp Portal वर ऑनलाईन तक्रार दाखल करून दिनांक १८/०७/२२३ रोजी तक्रारदार घरी हजर असतांना अज्ञात वॉटसप धारकाने तसेच टेलीग्राम अकाउंट धारकाने वर्क फ्रॉम होम करून नफा मिळविण्याचे आमिष दाखवून त्याकरिता दिलेले टास्क पुर्ण करण्यास सांगुन फोन पे वर जमा केले. त्या नंतर पुन्हा वेगवेगळी कारणे सांगून विश्वास संपादन केले. व एकूण २,०६,०००/- रूपयांची तक्रारदार यांची ऑनलाईन फसवनुक केली. फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

➢ **ईतर :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | नागपुरी गेट अप न ४८९/२३ कलम २८५ भादवी | ट्रान्सर्पोट नगर अमरावती | दि.२७.०९.२३ चे ००.११ वा दि.२७.०९.२०२३ चे ०१.१८ वा | सरतर्फे पोहेका कैलास जाधव ब न १२९६ पो स्टे नागपुरीगेट अमरावती शहर | एफाज रजा मिजासोदृदीन वय १९ वर्ष रा चिलमछावणी | **हकिकत अशा प्रकारे आहेक कि आम्ही पोहेका** कैलास जाधव ब न १२९६ पो स्टे नागपुरीगेट अमरावती शहर आज रोजी पो स्टे हदृदीत सोबत नापोका १४८२ असे नाईट पेट्रलिंग करिता असतानां दि.२७.०९.२३ चे ००.११ वा च्या दरम्यान ट्रान्सपोर्ट नगर अमरावती येथे आले असता एक ईसम त्याचे ताब्यातील दुकान सार्वजनिक ठिकाणी मानवी जिवीतास धोका निर्माण होईल किंवा असे कोणतेही बंदोबस्त न करता ज्वालाग्राही पदार्थ स्वताचे मालकिचे व कबजात असलेले चायनिज चे दुकान लावुन तेथे विक्री करण्याकरिता पदार्थ बनवित असतांना मिळुन आला.त्याचे पंचासमक्ष नाव गाव पत्ता चिवाचारले असत त्याने त्याचे नाव एफाज रजा मिजासोदृदीन वय १९ वर्ष रा चिलमछावणी अमरावती असे सांगितल्याने नमुद ईसमाच्या अशा ज्वालाग्राही (गॅस सिलेंडर) अगर ज्या पासुन आग लागुन मानवी जिवीतास धोका र्निमाण होवु नये याकरिता पुरेसा आवश्यक असलेला बंदोबस्त करण्याचे जाणिवपुर्वक टाळले करिता नमुद आरोपी विरूध कलम २८५ भादवी प्रमाणे गुन्हा नोंद होणे करिता आमची कायदेशिर फिर्यादी आहे अशा फिर्यादीच्या लेखी रिर्पोट वरुन गुन्हा दाखल |
| २ | नागपुरी गेट अप न ४९०/२३ कलम १२२ म पो का | मसांनगंज नागोबा ओटा नं ३ अमरावती | दि.२७.०९.२३ चे ०२.१० वा दि.२७.०९.२०२३ चे ०४.३४ वा | सरतर्फे पोहेका शंकर बावनकुळे ब न ७९ पो स्टे नागपुरीगेट अमरावती शहर | शेख ईमरान उर्फ रेड्डी शेख असलम वय २४ वर्ष रा गवळीपरा अखाडयाजवळ अमरावती ह मु राजा पेंटर यांच्या घरी भाडयाने आझाद नगर अमरावती | **हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे पो स्टाफ सह दि.२६.०९.२०२३ चे २१.०० वा ते दिण्२७.०९.२०२३ चे ०९.०० वा पावेतो पो स्टे परिसरात नाईट गस्त व गुन्हेगार चेकिंग डयुटी करिता असतांना नमुद घ ता वेळभ व ठिकाणी मसांनगंज नागोबा ओटा नं ३ परिसरात मध्य रात्री एक इसम हा संशयित रित्या दखलपात्र गुन्हा करण्याच्या ईरादयाने भटकत असलयाने दिसता व तो आम्हा पोलीसांची चाहुल लागताच स्वाताचे अस्तित्व लपविण्याकरिता आडोष्याला अंधारात लपला त्यास आम्ही व सोबत असलेलल्या पो स्टाफ च्या मदतीने जागीच पकडुन त्यास एवढया रात्री सदर परिसरामध्ये फिरण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीचे असमाधान कारक उत्तर दिल्याने परिसरातील २ पंचाना बोलावुन पंचासमक्ष त्याला त्याचे नाव गाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव** शेख ईमरान उर्फ रेड्डी शेख असलम वय २४ वर्ष रा गवळीपरा अखाडयाजवळ अमरावती ह मु राजा पेंटर यांच्या घरी भाडयाने आझाद नगर अमरावती असे सांगितले सदर ईसम हा मदय रात्री दखलपात्र चोरी सारखा गुन्हा करण्याचे उद्देशाने भटकत असल्याची पंचासमक्ष खात्री |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | झाल्याने त्याच्यावर कलम १२२ मपोका प्रमाणे कारवाही करणे कामी ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे जवळ कोणतेही मौल्यावान वस्तु किंवा पैसा मिळुन आला नाही तसेच त्याच्या शरिराराची व त्यावरील माराची पाहणी केली असता कोणतेही जुने किंवा नविन निशान दिसुन आले नाही सदर ईसम सुर्यास्त ते सुर्योदय दरम्यान स्वताचे अस्तित्व लपवुन ए,ादा दखलपात्र चोरी सारखा गुन्हा करण्याच्या उद्द्देशाने मिळुन आल्याने सदर आरोपीचे हे कृत्य कलम १२२ प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| **१** | नागपुरी गेट अप न ४९१/२३ कलम ४,२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ म पो का | पठाण चौक अमरावती | दि.२७.०९.२३ चे ०३.१० वा दि.२७.०९.२०२३ चे ०५.०२ वा | सरतर्फे पोहेका शंकर बावनकुळे ब न ७९ पो स्टे नागपुरीगेट अमरावती शहर | मोहम्मद शोहेब मोम्मद युसुफ वय २५ वर्ष रा पठाण चौक अमरावती | **हकिकत अशा प्रकारे आहे कि, दि.२६.०९.२०२३ चे २१.०० वा ते दि.२७.०९.२०२३ चे ०९.०० वा पावेतो पो स्टे गुन्हेगार चेकिंग डयुटी करिता असतांना ०३.०५ वा पेट्रोलिंग पठाण चौक अमरावती येथे एक ईसम संशयित रित्या अंधारात भटकत असताना दिसला त्यास पो स्टाफ च्या मदतीने थांबवुन विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीचे असमाधान कारक उत्तरे दिली तसेच त्यांची अंग झडती घेतली असता त्याचे ताब्यातुन एक जुना वापरता चाकु मिळुन आला सदर ईसमास सोबत असलेल्या पो स्टाफ च्या मदतीने पंचासमक्ष पठाण चौक येथे ताब्यात घुेवन** मोहम्म्द शोहेब मोहम्मद युसुफ वय २५ वर्ष रा पठाण चौक अमरावती असे सांगितत्रले त्याने घातलेल्या उजव्या पॅन्टच्या खिशातुन एक जुना वापरता चाकु ज्याच्या मुठीची लांबी ३.१ इंच व पात्याची लांबी १५.१ इंच अशा वर्णनाच्या पुर्ण चाकुची लांबी १८.२ इंच किंमत अ.४०० रू च्या वर्णनाचा चाकु मिळुन आला सदर चाकु जागीच पंच नामा करुन पंचासमक्ष जप्त करण्यात आला यातील आरोपी नामे मोहम्म्द शोहेब मोहम्मद युसुफ वय २५ वर्ष रा पठाण चौक अमरावती याने मा पोलीस उपासुक्त अमरावती शहर यांचे आदेश क्र पो आ अ/वि शा/का व सु /३६२४/२०२३ दि.२०.०९.२०२३ प्रमाणे ३७ (१)(३)मपोका यांचे उल्लघंन करून आरोपी अवैध रित्या आपल्या जवळ शस्त्र चाकु बाळगल्याने मिळुन आल्याने नमुद आरोपीचे हे कृत्य कलम कलम ४,२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ म पो का प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

➢ **अकस्मात मृत्यु :-**

| **अ. क्र.** | **पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम** | **घटना स्थळ** | **मृतकाचे नांव** | **फिर्यादी** | **मरणाचे कारण** | **अकस्मात मृत्यूचे विवरण** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| **३.** | बडनेरा मर्ग क्र. ६५/२३ कलम १७४ जा. फौ. | रेल्वे स्टेशन चौक बडनेरा. | अनओळखी पुरुष इसम वय अं. ६५ वर्ष | पो.हे कॉ. विशाल ब.न. ११० पो. स्टे बडनेरा | मरणाचे कारण समजुन आले नाही. | हकीकत अशा प्रकारे आहे की आम्ही पो.हे कॉ. विशाल ब.न. ११० पो. स्टे बडनेरा दि. २६/०९/२०२३ रो. २१/०० वा. ते ०८/०० वा पोवेतो तपास मदत ड्युटी असताना २२/०० वा. जिल्हा सामान्य रुग्णालय अम. येथुन आम्ही अनओळखी इसमाचे वय अम ६५ यांचा मेमो क्र. ०४१३३० चा मेमो पो. स्टे ला प्राप्त करुन आल्याने सदरचा मेमो वरुन मर्ग दाखल करुन तपासात घेतला. |

➢ **जुगार रेड :-**

| **अ.क्र .** | **पो.ठाणे** | **गु.र. नं. व कलम** | **गुन्हा घडला ठिकाण** | **गुन्हा घडला ता.वेळ** | **गुन्हा दा. ता.वेळ** | **हकीकत** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **६** | **७** | **८** | **१२** |
| **१** | **बडनेरा** | **अप क्र.६९९/२३ कलम १२ अ )म.जु.का.** | **आठवडी बाजार नवी वस्ती बडनेरा** | **दि.२७/०९/२०२३ चे १२/३० वा.** | **दि.२७/०९/२०२३ चे १५/१४ वा.** | **हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन १)नगदी १७६०/- रू व ०१ त् १० आकड्याची वरली मटका जुगारच्या चिठ्या व ०१ बॉलपेन कि.अ.०५ रु चा असा एकुण १७६५ रु चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल क** |